R.No. MHHMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ५४

दि.०६ फेब्रुवारी २०२६,वार: शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## सोमवारी होणार महापौरांची निवड जिल्हाधिकारी असणार



लातूर /प्रतिनिधी : लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर पदाची निवड सोमवार दि. ९ फेब्रुवारी रोजी होणार आहे.या निवडणुकीसाठी पिठासीन अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी काम पाहणार आहेत.

महापौर पदासाठी आज अर्ज दाखल करण्यात आले. महापौर पदासाठी काँग्रेसकडून जयश्री भालचंद्र सोनकांबळे व वंचित बहुजन आघाडीकडून निकिता रोहित सोमवंशी यांनी अर्ज दाखल केले आहेत. उपमहापौर पदासाठी काँग्रेसकडून स्नेहल श्रीकांत उटगे व वंचित बहुजन आघाडी कडून सचिन अर्जुनराव गायकवाड यांचे अर्ज दाखल झाले आहेत.

महापौर व उपमहापौर निवडीसाठी सोमवारी सकाळी ११ वाजता मनपाच्या सभागृहात विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे.यावेळी अर्जांची छाननी केली जाईल.त्यानंतर अर्ज मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा कालावधी दिला जाईल. कोणीही अर्ज मागे घेतले नाहीत तर त्यानंतर महापौर पदासाठी व उपमहापौर पदासाठी हात उंचावून मतदान घेतले जाईल. अनुक्रमे मतदान झाल्यानंतर दोन्ही पदांसाठी उमेदवारांना पडलेल्या मतांनुसार उमेदवाराची घोषणा पिठासीन अधिकाऱ्यांकडून केली जाईल अशी माहिती महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आली.

## ज्ञानाचे दान हेच सर्वश्रेष्ठ दान..!- राहुल जावळे (गुरुजी)



नवी मुंबई / के. एच. हनवते :-गया येथील दहा दिवसांच्या विशेष सोहळ्यात 'प्रबुद्ध भारत' साप्ताहिक दिनानिमित्त विनय पिटक ग्रंथाचे वाचन आणि वितरण करण्यात आले होते. सदर ग्रंथ (बिहार) गया येथून आणलेला हा ज्ञानरूपी ठेवा नेरूळ नवी मुंबई मधील धम्म प्रचारक : कल्याणराव हनवते यांना प्रदान करताना राहुल जावळे (गुरुजी) यांनी धम्म प्रसाराचा एक नवा आदर्श घालून दिला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासमोर झालेला हा ग्रंथभेटीचा क्षण उपस्थित सर्वांसाठीच प्रेरणादायी ठरला.

या प्रसंगी बोलताना राहुल जावळे गुरुजी म्हणाले की, विनय पिटक हा ग्रंथ केवळ वाचण्यासाठी नसून तो आचरणात आणण्यासाठी आहे. (बिहार) गया येथील पवित्र भूमीतून मिळालेली ही शिदोरी कल्याणराव हनवते यांच्या सारख्या धम्मप्रेमी व्यक्तीला देताना मला अत्यंत आनंद होत आहे. ज्ञानाचे दान हेच सर्वश्रेष्ठ दान आहे..!

ही भेट स्वीकारल्यानंतर कल्याणराव हनवते यांनी कृतज्ञता व्यक्त केली. महापुरुषांच्या साक्षीने झालेला हा ग्रंथभेटीचा सोहळा नवी मुंबईतील धम्म उपासकांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे.

(बिहार) गया येथील जागतिक शांती पठण सोहळ्यात प्राप्त झालेला 'विनय पिटक' हा मौलिक ग्रंथ आज राहुल जावळे यांच्या हस्ते, नेरूळ येथील शिवरायांच्या पुतळ्यासमोर कल्याणराव हनवते यांना भेट म्हणून प्रदान करण्यात आला. धम्म विचारांची ही देवाणघेवाण खरोखरच कौतुकास्पद आहे.

## जिल्हा परिषदेवर महाविकास आघाडीची सत्ता द्या जनतेचा विकास करु-खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर



धाराशिव -जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व काँग्रेस आय आघाडीचा जिल्हाभर जनतेशी थेट संवाद आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व काँग्रेस आय आघाडीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ धाराशिव जिल्ह्यात विविध ठिकाणी मतदारांशी थेट संवाद साधत प्रचारसभा पार पडल्या.

औसा तालुक्यातील हसेगाव, कार्ला व गुबाळ, कळंब तालुक्यातील येरमाळा व दहिफळ, परंडा तालुक्यातील लोणी, कंडारी, डोंजा (बू.) व चिंचपुर (बू.), भूम तालुक्यातील पाथरूड तसेच वाशी तालुक्यातील पारगाव येथे या सभा उत्साहात पार पडल्या या सर्व सभांमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य सेवा, शिक्षण, ग्रामविकास, शेतकरी प्रश्न, महिला सक्षमीकरण तसेच युवकांसाठी रोजगाराभिमुख उपक्रम अशा विविध विकासकामांचा ठोस व वस्तुनिष्ठ लेखाजोखा जनतेसमोर मांडण्यात आला.

आम्ही केवळ आश्वासनांचे नाही तर प्रत्यक्ष कामांचे राजकारण करतो. केलेल्या विकासकामांच्या विश्वासावरच ही निवडणूक लढवत आहोत, अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली.

या प्रचारसभांमध्ये पुढील उमेदवारांच्या प्रचारार्थ जनतेशी संवाद साधण्यात आला औसा तालुका : सौ. अरुणा संतोष सोमवंशी, लालासाहेब बब्रुवान साळुंके, पंचफुलाबाई सुधाकर घोडके, श्री. तानाजी भानुदास जाधव, श्री. विलास व्यंकटराव काळे, प्रवीण बिभीषण जाधव. कळंब तालुका : सौ. सुनंदा सुब्राव वाघमारे, सौ. वृषाली राहुल पाटील, ओव्हाळ शिल्पा भगवान, सौ. रुपाली बाळाजी नागटिळक, सौ. अनुराधा राहुल दिगे, श्री. श्याम रंगनाथ देशमुख परंडा तालुका : सौ. ताराबाई गोपीनाथ सोदाळे, सौ. राणी रेवनाथ ढोरे, कु. डॉ. धनश्री विश्वास लोकरे, श्री. वशिष्ट माणिक जतकर, सौ. किसकिंदा बाळासाहेब देशमुख, सौ. कल्पना बुद्धीवाण गोडगे, श्री. बालाजी शिवाजी गंगाविठ्ठल, श्री. तुषार शिवाजीराव गोफणे (पाटील), श्री. तानाजी कल्याण पाटील, श्री. युवराज रणजीतसिंह पाटील, श्री. शिवाजी नवनाथ कासारे भूम तालुका : श्री. शंकर तुळशीराम नागरगोजे, डॉ. चेतन वासुदेव बोराडे, सौ. सरिता रविंद्र नगरगोजे वाशी तालुका : सौ. वर्षा तात्यासाहेब गायकवाड, ड. अनुराधाताई महेश आरवाडे उमेदवारांनी प्रामाणिक सेवा, पारदर्शक कारभार आणि लोकहितासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली या सर्व सभांना शिवसैनिकांसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तर महापौरपदासाठी भाजपाचा वंचितला पाठींबा

### आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांची माहिती

लातूर/प्रतिनिधी : काँग्रेसने निवडणूकीपूर्वी आघाडी करून विजयासाठी वंचित बहुजन आघाडीला सोबत घेतले. निवडणूकीत अपेक्षित लाभ पदरात पडल्यानंतर मात्र वंचितला बाजूला सारल्याचे दिसून आले. यामुळेच महापौर पदासाठी वंचित बहुजन आघाडीने स्वतंत्रपणे उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. आघाडीने आपली उमेदवारी कायम ठेवली तर भाजपा वंचित बहुजन आघाडीच्या महापौर व उपमहापौर पदासाठीच्या उमेदवारांना पाठींबा देईल, अशी माहिती भाजपाचे निवडणूक प्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली.

लातूर मनपाच्या निवडणुकीत काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीला सोबत घेतले होते. एका बाजूने काँग्रेस आघाडी आणि दुसजया बाजुने भाजपा अशी लढत झाली. वंचितच्या साथीमुळे पराभवाच्या छायेत असणारी काँग्रेस निवडणुकीनंतर बहुमतात आल्याचे दिसून आले. भाजपाने निवडणुकीत जोरदार लढत दिली. निवडणुकीनंतर जनतेने दिलेला कौल भाजपाने मान्य केला.

निवडणुकीनंतर निर्माण झालेले चित्र पाहता काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीचा वापर केवळ सत्ता प्राप्त करण्यासाठी केला असल्याचे स्पष्ट झाले आहे. महापौर व उपमहापौर निवडताना वंचित बहुजन आघाडीलाही समान वाटा मिळणे अपेक्षित होते. परंतु तो मिळाला नसल्याचे चित्र समोर आले आहे. यातून आघाडीला मतदान केलेल्या मतदारांचाही अवमान झालेला आहे. सदर परिस्थिती लक्षात घेवून वंचित बहुजन आघाडीने महापौर पदासाठी निकिता रोहीत सोमवंशी तर उपमहापौर पदासाठी सचिन अर्जुनराव गायकवाड यांची उमेदवारी दाखल केलेली आहे. वंचित बहुजन आघाडीने सदर निवडणुक लढविण्याची भूमिका कायम ठेवत आपले उमेदवार माघारी घेतले नाहीत तर भाजपा वंचित बहुजन आघाडीला मतदानाच्या वेळी पाठींबा देईल, अशी माहिती भाजपा निवडणूक प्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली आहे.

## भ्रष्टाचाराचा कळस गाठणा-या भाजपला मतदारांनी पराभूत करून जमीनीवर आणावे.



लातूर । प्रतिनिधी.-लातूर ग्रामीण मतदारसंघात विद्यमान भाजप आमदारांकडून कोणतेही ठोस विकासकाम झाले नसून जनतेच्या भावनांशी खेळण्याचे काम भाजपकडून सातत्याने सुरू असल्याचे लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले.रेणापुर तालुक्यातील पोहरेगाव येथे जिल्हा परिषद गटाचे उमेदवार मनिषा गंगासिंह कदम, पोहरेगाव पंचायत समिती डॉ तात्याराव सखाराम वाघमारे, निवाडा पंचायत समिती गण बालाजी पंडीत गोटके यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते.

ते म्हणाले की, भाजपच्या चुकीच्या धोरणांमुळे सामान्य जनता मोठ्या प्रमाणात भरडली जात आहे. ग्रामीण भागात मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी नागरिकांकडून थेट पैसे घेतले जात असल्याचे उघडपणे सांगितले जात आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. सत्तेचा गर्व भाजपच्या नेत्यांच्या डोक्यात गेला असून हा गर्व जिल्हा परिषद निवडणुकीत मतदार भाजप उमेदवारांना पराभूत करून उतरवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लातूर ग्रामीण मतदारसंघातील भाजप आमदारांनी अडचणीच्या काळात मतदारसंघाला वाऱ्यावर सोडले असल्याची टीकाही त्यांनी केली. लातूर ग्रामीण मतदारसंघ हा एकोप्याने चालणारा व विकास जोपासणारा मतदारसंघ असून या मतदारसंघाची प्रतिष्ठा जपण्याचे काम सर्वांनी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा परिषद निवडणुकीत भाजप बॅकफूटवर गेली असून सर्वत्र काँग्रेस पक्षाची सकारात्मक हवा दिसून येत असल्याचा दावा त्यांनी केला. काँग्रेस पक्षाच्या विचारधारेतूनच लातूर जिल्ह्याचा विकास झाला आहे. मांजरा परिवारातील साखर कारखाने व लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून ग्रामीण भागासाठी अनेक योजना यशस्वीपणे राबवण्यात आल्या असून त्यातून शेतकरी व सर्वसामान्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडून आले असल्याचे त्यांनी नमूद केले.

लोकांच्या प्रश्नांची जाण असणारे, सक्षम व विकासाभिमुख उमेदवार काँग्रेस पक्षाकडून देण्यात आले आहेत. त्यामुळे येत्या ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मतदानात सर्व काँग्रेस उमेदवारांना हाताच्या चिन्हासमोरील बटन दाबून ग्रामीण भागाची सेवा करण्याची संधी द्यावी, असे आवाहन धिरज विलासराव देशमुख यांनी मतदारांना केले.

यावेळी अर्चना कमलाकर सोळंके यांनी पोहरेगाव गटातून आपला उमेदवारी अर्ज मागे घेवून काँग्रेस पक्षाला पाठिंबा दिल्या बद्दल त्यांचा सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले.

सदरील सभेस काँग्रेस पक्षाचे उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय...

### जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक : लोकशाहीच्या मुळांवरची कसोटी

राज्याच्या ग्रामीण लोकशाहीसाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे मतदान ७ फेब्रुवारी रोजी होणार असून, ९ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे. या निवडणुका केवळ सत्ताबदलापुरत्या मर्यादित नसून, ग्रामीण विकासाची दिशा ठरवणाऱ्या आणि लोकशाहीच्या मुळांना बळ देणाऱ्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था : लोकशाहीचा पाया

भारतीय संविधानाने स्थानिक स्वराज्य संस्थांना विशेष महत्त्व दिले आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या या ग्रामीण भागातील शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, महिला व बालकल्याण अशा मूलभूत प्रश्नांशी थेट संबंधित आहेत. त्यामुळे या संस्थांमधील प्रतिनिधी हे केवळ राजकीय नेते नसून, ग्रामीण जनतेचे थेट सेवक असतात.

निवडणूक म्हणजे जबाबदारीची संधी

७ फेब्रुवारी रोजी होणारे मतदान हे नागरिकांसाठी केवळ हक्क नाही, तर ती जबाबदारीची संधी आहे. ग्रामीण भागात आजही अनेक समस्या प्रलंबित आहेत बेरोजगारी, शेती संकट, पाणीटंचाई, आरोग्य सुविधा, शिक्षणाचा दर्जा. या समस्यांवर उपाय करणारे नेतृत्व निवडण्याची संधी मतदारांच्या हातात आहे.

मतदान टाळणे म्हणजे निर्णय दुसऱ्यांवर सोपवणे होय. त्यामुळे प्रत्येक मतदाराने निर्भयपणे, विचारपूर्वक आणि निःस्वार्थपणे मतदान करणे अत्यावश्यक आहे.

राजकीय पक्षांसाठी विश्वासाची लढाई

या निवडणुका राजकीय पक्षांसाठीही महत्त्वाच्या ठरणार आहेत. स्थानिक प्रश्नांवर केलेले काम, दिलेली आश्वासने आणि जनतेशी असलेला संपर्क याची खरी कसोटी या निवडणुकांत लागणार आहे. मोठ्या घोषणा नव्हे, तर प्रत्यक्ष कामावर मतदार कौल देतील, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

प्रशासनाची भूमिका : निष्पक्ष व पारदर्शक प्रक्रिया

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण आणि भयमुक्त पार पडणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मतदानाच्या दिवशी कुठलाही दबाव, गैरप्रकार किंवा प्रलोभन होणार नाही, याची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक आहे. तसेच ९ फेब्रुवारी रोजी होणारी मतमोजणीही पूर्ण पारदर्शकतेने पार पडणे अपेक्षित आहे.

महिलांचा आणि युवकांचा सहभाग महत्त्वाचा

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण देऊन मोठी संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या निवडणुकांमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग आणि नेतृत्व अधिक ठळकपणे पुढे यावे, ही अपेक्षा आहे. तसेच युवकांनीही केवळ मतदार म्हणून नव्हे, तर सजग नागरिक म्हणून प्रक्रियेत सहभागी व्हावे.

लोकशाहीचा खरा अर्थ

लोकशाही केवळ निवडणुकीपुरती मर्यादित नसली, तरी निवडणूक हा तिचा सर्वात महत्त्वाचा टप्पा असतो. ७ फेब्रुवारीचे मतदान आणि ९ फेब्रुवारीची मतमोजणी हे ग्रामीण महाराष्ट्राच्या पुढील वाटचालीची दिशा ठरवणारे ठरणार आहे.

निष्कर्ष

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका म्हणजे केवळ सत्ता मिळवण्याची स्पर्धा नाही, तर ग्रामीण जनतेच्या अपेक्षा, समस्या आणि भविष्यासंबंधी आशा यांचा कौल आहे. मतदारांनी सजगपणे मतदान करून सक्षम, प्रामाणिक आणि काम करणारे प्रतिनिधी निवडावेत, हीच या निवडणुकीकडून अपेक्षा आहे.

लोकशाही मजबूत करायची असेल, तर मतदान हाच सर्वात प्रभावी आवाज आहे आणि तो आवाज ७ फेब्रुवारी रोजी नक्की उमटला पाहिजे.

### जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीनिमित्त.लातूर जिल्ह्यात शनिवारी भरणारे आठवडी बाजार राहणार बंद

लातूर: लातूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १० पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी शनिवार, ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होत आहे. या निवडणुकीमध्ये मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, तसेच मतदान शांततेत पार पडावे, यासाठी लातूर जिल्ह्यात शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी भरणारे आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिले आहेत.

त्यानुसार लातूर तालुक्यातील कन्हेरी, औसा तालुक्यातील लिंबाळा दाऊ, अशिव व किल्लारी, रेणापूर तालुक्यातील पानगाव, निलंगा तालुक्यातील आंबुलगा बु., चाकूर तालुक्यातील वडवळ ना. आणि जळकोट तालुक्यातील घोणसी येथे शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ भरणारा आठवडी बाजार बंद राहणार असून, या दिवशीचा आठवडी बाजार इतर दिवशी भरविण्यात येणार आहे. मार्केट ण्ड फेअर क्ट १९८२ चे कलम ५ (अ) मधील तरतुदीनुसार पणन संचालक यांनी दिलेल्या मान्यतेनुसार हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

# ’ब्लॅक बॉक्स’

विमान आकाशात झेपावतं तेव्हा आपण सगळे खिडकीतून बाहेर दिसणाऱ्या ढगांमध्ये हरवून जातो.पण समजा,काहीतरी अघटित घडलं तर? त्या शेवटच्या काही मिनिटांत विमानात नेमकं काय झालं होतं, हे सांगायला कधीकधी कोणीच जिवंत उरत नाही. पण तरीही जगाला सत्य कळतं. कसं? त्याचं उत्तर दडलेलं असतं एका छोट्याशा पेटीत, ज्याला आपण ’ब्लॅक बॉक्स’ म्हणतात.


याचं नाव ’ब्लॅक बॉक्स’ असलं तरी याचा रंग काळा नसतो,तो असतो एकदम भडक नारिंगी (ड्ढीळसहीं जीरपसश). जेणेकरून अपघात झालाच, तर ढिगाऱ्यात किंवा समुद्राच्या तळाशी तो लांबूनच उठून दिसावा. आता तुम्ही म्हणाल, मग याला ’ब्लॅक’ का म्हणतात? कदाचित त्यात दडलेल्या भीषण सत्यामुळे किंवा सुरुवातीच्या काळातल्या डिझाईनमुळे हे नाव पडलं असावं.

विमानात दोन प्रकारचे ब्लॅक बॉक्स असतात.

एक म्हणजे उतठ (उेलज्ञळीं तेळलश ठशलेीवशी) जो वैमानिकांच्या गप्पा, कंट्रोल रूमशी झालेलं बोलणं आणि विमानातले इतर आवाज रेकॉर्ड करतो.

आणि दुसरं म्हणजे ऋऊठ (ऋश्रळसहीं ऊरींर ठशलेीवशी) जो विमानाचा वेग, उंची, इंजिनची स्थिती अशा तांत्रिक गोष्टींची नोंद ठेवतो. हे म्हणजे आपल्या आयुष्याचा ’चित्रगुप्त’च आहे असं समजा, जो प्रत्येक सेकंदाचा हिशोब ठेवतोय!

विचार करा, एखादं विमान कोसळत असताना वैमानिक शेवटचे काय प्रयत्न करत असतील? हे रेकॉर्डिंग ऐकणं म्हणजे काळजाचा थरकाप उडवणारा प्रकार असतो. अनेकदा वैमानिकाचे शेवटचे शब्द चरूवरू! किंवा देवाचं नाव घेणारे असतात.ते ऐकताना




अंगावर काटा येतो. पण हेच शब्द पुढे - नंतर विमान प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांचे जीव वाचवण्यासाठी कारणीभूत ठरतात. कारण यातून मिळालेल्या माहितीचा उपयोग करून सुधारणा करण्यात येतात.

१९८५ चं एअर इंडियाचं ’कनिष्क’ विमान आठवतंय अटलांटिक महासागरात कोसळलेल्या त्या विमानाचं रहस्य याच ब्लॅक बॉक्सने उलगडलं होतं. खोल समुद्रात शोध घेणं सोपं नव्हतं, पण त्या बॉक्समधून मिळालेल्या माहितीमुळेच कळलं की विमानात बॉम्बस्फोट झाला होता. जर तो बॉक्स मिळाला नसता, तर ते एक गूढच राहिलं असतं, नाही का

२०१० चं मंगळूर विमानतळावरचं एअर इंडिया एक्सप्रेसचं क्रॅश बघा. त्या ब्लॅक बॉक्सने काय सांगितलं माहितीये? लँडिंगच्या वेळी वैमानिक चक्क झोपला होता आणि त्याचे घोरण्याचे आवाज त्या बॉक्समध्ये रेकॉर्ड झाले होते. विचार करा, एका माणसाची डुलकी किती जीवावर बेतू शकते, हे जगाला त्या निर्जीव पेटीने ओरडून सांगितलं.

हा बॉक्स म्हणजे विज्ञानाची कमाल आहे. हजारो फूट उंचीवरून पडणं असो, भीषण आग असो किंवा समुद्राचा प्रचंड दाब - हा बॉक्स सहजासहजी फुटत नाही. स्टील आणि टायटॅनियमच्या जाड थरांमध्ये हे ’सत्य’ अत्यंत सुरक्षितपणे लपवलेलं असतं. एका अर्थाने, हे एका संपलेल्या जगाचं शेवटचं ’बॅकअप’ असतं.

विज्ञानाची प्रगती कितीही झाली तरी निसर्गापुढे आपण हतबल होतोच. पण ब्लॅक बॉक्ससारख्या गोष्टी आपल्याला आपली चूक सुधारण्याची संधी देतात. एका अपघातातून मिळालेली माहिती पुढच्या लाखो प्रवासांना सुरक्षित करते. म्हणूनच, ब्लॅक बॉक्स हा केवळ तांत्रिक डेटा नसून, तो एका दुर्दैवी घटनेतून मिळालेला धडा असतो.

*कधी कधी वाटतं की आपल्या आयुष्याचाही असाच *एखादा ’ब्लॅक बॉक्स’ असता, ज्याने आपल्या चुका आपल्याला ऐकवल्या असत्या, तर आपण किती सुधारलो असतो ना? काय वाटतं तुम्हाला?

## लातुर जिल्हा परिषदेच्या पाखरसांगवी गट व गणासह,गंगापूर पंचायत समिती गणातील काँग्रेस आघाडी उमेदवार प्राचारार्थ जाहीर सभा संपन्न

लातुर प्रतिनिधी:-.-लातुर जिल्हा विराट सभेसाठी एकत्र आलो असून लाच दिल्याशिवाय काम होत व उद्योजक धार्जिनी धोरणे राबविनाऱ्या





परिषद व पंचायत समिती स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक २०२६ प्रचार आता शेवटच्या टप्प्यात पोहचला असून उमेदवारांच्या प्राचारार्थ जाहीर सभा,कॉर्नर बैठकासह मतदारांच्या भेटीगाठी घेत उमेदवाराकडून संवाद साधला जात आहे.लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ निमित्ताने राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातुर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरूवार दि.०५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी लातुर तालुक्यातील पाखरसांगवी जिल्हा परिषद गट,व गण तसेच गंगापूर पंचायत समिती गणातील काँग्रेस आघाडी उमेदवारांच्या निवडणूक प्राचारार्थ गंगापूर या ठिकाणी प्रचार सभा पार पडली.

लातुर तालुक्यातल्या पाखरसांगवी जिल्हा परिषद गटातील सौ.सोनाली रमेश थोरमोटे,व पंचायत समिती गणातील श्री.अक्षय आप्पासाहेब देशमुख आणि गंगापूर पंचायत समिती गणातील सौ.शिवानी रामकृष्ण शिंदे या काँग्रेस आघाडी उमेदवारांच्या प्रचारार्थ जय गंगापूर येथील किसान विद्या मंदीर प्रांगण या ठिकाणी जाहीर प्रचार सभेचे आयोजन करण्यात आलेले होते.

लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रचारात लातुर तालुक्यातील पाखरसांगवी जिल्हा परिषद गट व गण तसेच गंगापूर पंचायत समिती गणातील कॉंगेस आघाडीच्या उमेदवाराना चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत आहे.यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले,लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक निमित्ताने आपण गंगापूर या ठिकाणी आयोजित गंगापूर हा कॉंगेसचा बाले किल्ला आहे.या ठिकाणी येताना बाभळगाव पासून इथे येताना आदरणीय विलासराव देशमुख साहेबानी निर्माण केलेले वैभव पाहायला मिळाले.या भागाचा मोठ्या प्रमाणावर कायापालट झाला असल्याचे दिसून आले आणि हे काँग्रेस पक्ष गेली ६० वर्ष आपल्या विश्वासाला तडा न जाऊ देता केले असल्याचे त्यांनी सांगत काँग्रेस एवढी खोलवर रुजलेली असून त्याला कोणीही धक्का लावू शकत नाही असे म्हणत गंगापूरचे आदरणीय शिवाप्पा कानडे यांच्या आठवणींना उजाळा त्यांनी यावेळी दिला.

लातुर जिल्हा परिषदेत १० वर्ष भाजपची सत्ता होती आपण जिल्ह्यात राज्यात व देशात गेली १० वर्ष सत्तेत आहेत पण या काळात सर्व सामान्य माणसाच्या कल्याणचे काम करता आलेले नाही साधे जिल्हा रुग्णालय त्यांना अद्याप करता आलेले नाही

आणि हे आता आपल्यासमोर मत मागायला येत असून त्यांना तसा नैतिक अधिकार तरी आहे का याचा विचार करावा असे म्हणत लातुर महानगरपालिका ताब्यात घेऊन त्यांना लातूरचे लचके तोडायचे होते पण लातूरच्या नागरिकांनी लातुर मनपाच्या तिजोरीच्या चाव्या आमच्या हातात दिल्या असून या निवडणुकीत लातुर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या चाव्या काँग्रेस पक्षाच्या हाती देतील याचा विश्वास असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले,आज आपण पाहतो आहे लातुर जिल्ह्यात असेल की मग राज्यात असेल अथवा देशात असेल काय परिस्थिती आहे आपण पाहतो आहे.शासनाच्या योजनेचा लाभ देताना अर्जदार लाभार्थ्यांना पैसे द्यावे लागतात,शासकीय कार्यालयात नाही,घरकुल मिळत नाही,विहीर मंजूर होत नाही, पत्र्याचे शेड मंजूर होत नाही,गोठा मंजुरीस देखील पैसे मोजावे लागतात. भ्रष्टाचाराणे बरबटलेल्या कारभाराराला आपल्या मताच्या ताकदीने उलथून टाकायचे असून लातुर तालुका आणि लातुर जिल्ह्याला आपल्याला विकासाच्या मार्गावर न्यायचे आहे यासाठी काँग्रेस आघाडी च्या माध्यमातून आपल्याला या लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत स्वच्छ पारदर्शक कारभार करायचा आहे.यासाठी आपली साथ अत्यंत महत्वाची असल्याचे आमदार अमित देशमुख म्हणाले.

लोकसभा व विधानसभा या दोन्ही निवडणुकीत आश्वासन देऊन शेतकरी कर्जमाफी केली नाही,शेतकऱ्यांच्या सोयाबीन ला भाव नाही,कापसाला भाव नाही,शेती क्षेत्र जागतिक स्तरावर केंद्राने खुले केले यामुळे येणाऱ्या काळात विदेशातील सोयाबीन, डाळी भारतात येतील आणि आज जो भाव आपल्या शेतमालाला मिळतो तो या केंद्र सरकारने केलेल्या करारामुळे मिळनार नाही.लाडक्या बहिणींना आमची सत्ता नाही आल्यास योजना बंद होऊल असे म्हणतील पण आपण याच्या धमक्यांना अजिबात घाबरण्याची गरज नाही ही योजना कोणत्या एका पक्षाची नसून ती सरकारची आहे आणि ती बंद होणार नाही यामुळे लाडक्या बहिणींनी काळजी करू नये आशा शब्दात आमदार अमित देशमुख यांनी उपस्थित लाडक्या बहिणींना आश्वस्त केले.

पुढे बोलताना आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की,लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत आपल्याकडे मत मागायला हे भाजपचे लोक येतील आशा भ्रष्ट,भूलथापा देणाऱ्या,शेतकरी विरोधी भाजपला धडा शिकवायची आता वेळ आली असून काँग्रेस पक्षाने सर्व सामान्य कुटुंबातील उमेदवार आपल्याला दिलेले असून आपल्याला स्वर्गीय दत्तात्रय बनसोडे गुरुजी यांनी त्यांच्या अध्यक्ष पदाच्या काळात आपल्याला दिलेला विकासाचा वारसा पुढे न्यायचा आहे असे म्हणत त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा त्यांनी देत काँग्रेस आघाडीने दिलेल्या आपल्या माणसाला निवडून देऊन लातुर जिल्हा परिषद व पंचायत समितीत लोकाभिमुख आणि स्वच्छ पारदर्शक कारभारासाठी काँग्रेस अघाडीच्या सर्व उमेदवाराना बहुमतांनी विजयी करून लातूर जिल्हा परिषद व पंचायत समिती वर काँग्रेस पक्षाचा तिरंगा फडकवावा असे आवाहन उपस्थित मतदारांना आमदार अमित देशमुख यांनी यावेळी केले.

दरम्यान या जाहीर प्रचार सभेत पक्षाचे प्रभारी भाऊसाहेब आजबे,बाळासाहेब देशमुख, जितेंद्र देहाडे,सौ.सोनाली थोरमोटे यांनी आपले मनोगत व्यक्त करीत काँग्रेस आघाडीच्या सर्व उमेदवाराना बहुमताने विजयी करून लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती मध्ये पाठवावे आणि आपल्या सेवेची संधी उपलब्ध करून द्यावी अशी विनंती केली.यावेळी आशाताई शिंदे,विद्याताई पाटील, भास्कर शिंदे,प्रा.मोरे,प्रा.गोविंद घार, संजय पाटील खंडापुरकर, जनुमिया शेख,चंद्रशेखर दंडिमे, हरिभाऊ जाधव,कृष्णा बनसोडे, हरून पटेल,प्रमोद मस्के यांच्यासह पाखरसांगवी जिल्हा परिषद गट व गण यासह गंगापूर पंचायत समिती गणातील मतदार बंधू भगिनी, काँग्रेस आघाडी पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते,महिला भगिनी व परीसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज नगरपंचायत येथेसेप्टिक टँक क्लिनिंग मशीनचे लोकार्पण

केज/प्रतिनिधी –केज नगरपंचायत येथेसेप्टिक टँक क्लिनिंग मशीनचे लोकार्पण सोहळा केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा डॉ. सौ.सीताताई बनसोड व राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते डॉ.हारुणभाई इनामदार यांच्या हस्ते संपन्न झाला.



यावेळी बोलताना ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार म्हणाले की, शहरातील नागरिकांना संडास बाथरूमची टाकी भरल्यावर बाथरूम ब्लॉक झाल्यानंतर अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते त्या संबंधी नागरिकांची गैरसोय होती आपल्या केज येथेसेप्टिक टँक क्लिनिंग मशीननगरपंचायत कडे व केज शहरांमध्ये उपलब्ध नव्हती. यासाठी बाहेरील एखाद्या व्यक्तीची मशीन मागवायचे म्हटल तर मोठ्या प्रमाणात चार्ज देवा लागत होता. आपण पाठपुरावा करून केज नगरपंचायतला सेप्टिक टँक क्लिनिंग मशीनउपलब्ध केली असून आज या मशीनचे लोक अर्पण करून आजपासून ही मशीन नागरिकांच्या सेवेसाठी कार्यरत करत आहोत. यापुढे नागरिकांची गैरसोय होणार नाही. पुढे बोलताना इनामदार म्हणाले की, शहरातील ज्या नागरीकांना या मशीनची गरज भाषण त्यांनी तात्काळ केज नगरपंचायत ला संपर्क साधून आपले सेफ्टी टँक साफ करून घ्यावेत. यासाठी इतरांपेक्षा माफक दरामध्ये केज नगरपंचायत आपल्याला या मशीनच्या माध्यमातून सुविधा पुरवणार आहे. ज्यांचा सेफ्टी टँक साफ केला की, नगरपंचायत मार्फत त्यांची पावती फाडून त्यांच्याकडून चार्ज घेतला जाईल.

यावेळी जेष्ठ नेते डॉ.हारूणभाई इनामदार, नगराध्यक्षा डॉ. सौ.सीताताई बनसोड, गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेवक जलालभाई इनामदार, नगरसेविका सौ.पद्मिनी आक्का शिंदे, ज्येष्ठ नागरिक चंद्रकांत मस्के, नगरपंचायतचे कार्यालयीन अधीक्षक रमाकांत सोनकांबळे, लेखापाल महारुद्र वडकर, आस्थापना विभाग प्रमुख निखिल लांडगे, करवी विभाग प्रमुख अनिल हजारे, शहर समन्वयक गोविंद तपसे, स्वच्छता मुकादम भीमा शिंदे यांच्यासह पत्रकार बांधव व केज नगरपंचायतचे अधिकारी, कर्मचारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत वंजारवाडीतील शेकडो भाजप कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

रेणापूर:-- रेणापूर तालुक्यातील वंजारवाडी येथील




भाजप पक्षाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा काँग्रेस नेते धिरज विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे रेणापूर तालुक्यात काँग्रेस पक्षाची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे चित्र आहे.

काँग्रेसमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये सुनिल मुंडे, व्यंकट मुंडे, भरत घुगे, ऋषिकेष मुंडे, प्रकाश फड, दत्ता मुंडे, श्रीकृष्ण घुगे, सतीश घुगे, नितीन मुंडे, बालाजी मुंडे, उमेश मुंडे, ओमकार मुंडे, हणमंत मुंडे, मनोज घुगे, लक्ष्मण घुगे, नामदेव मुंडे, बाळासाहेब मुंडे, संपत मुंडे, श्रीमंत मुंडे, प्रशांत मुंडे, पवन फड, नरसिंग मुंडे, भक्तराम घुगे, केशव मुंडे, गोविंद घुगे, गणेश घुगे, परमेश्वर मुंडे, भागवत मुंडे, यशवंत मुंडे, ज्ञानोबा मुंडे, अमोल मुंडे, शत्रुघ्न घुगे, माऊली घुगे, अतुल मुंडे, रामभाऊ घुगे, लक्ष्मण मस्के, नवनाथ मस्के यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

हा पक्षप्रवेश पोहरेगाव येथे आयोजित सभेत पार पडला. यावेळी धिरज विलासराव देशमुख यांनी सर्व नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत करत पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. काँग्रेस पक्षाच्या विचारधारेवर विश्वास ठेवून सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी एकत्र काम करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या मोठ्या पक्षप्रवेशामुळे रेणापूर तालुक्यात आगामी काळात काँग्रेस पक्ष अधिक सक्षमपणे कार्य करेल, असा विश्वास स्थानिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

# मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय महिनाभरात कार्यान्वित होणार मुरुडकरांनी विकासाच्या पाठीशी राहावे आ. रमेशआप्पा कराड यांचे आवाहन

लातूर - भाजपाच्या नेतृत्वातील शासनाच्या माध्यमातून




मुरुडच्या विकासाला गती मिळाली. उपजिल्हा रुग्णालयासह मुरुडच्या पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर असून सर्व सोयींनी युक्त बसस्थानक उभारण्यात आले. ग्रामपंचायतीला नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासन दरबारी असून वर्षभरात मंजुरी मिळवून घेणार असल्याची ग्वाही देऊन येत्या महिनाभरात मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित होणार असून ही तालुका निर्मितीची पहिली पायरी आहे तेव्हा मुरुडकरांनी विकासाच्या पाठीशी राहून भाजपाच्या उमेदवारांना बहुमताने विजयी करावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

भारतीय जनता पार्टीचे मुरुड जिल्हा परिषद गटातील उमेदवार सौ. रंजनाताई बळीराम हिंगले, मुरुड - १ पंस गणातील उमेदवार उद्धव सूर्यभान चव्हाण आणि मुरुड - २ पंस गणातील उमेदवार सौ. मनिषा सचिन देवकर यांच्या प्रचारार्थ भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी सायंकाळी मुरुड येथे भव्य प्रचार जाहीर सभा झाली. या सभेस माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे, भाजपा किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, मुरुडच्या सरपंच अमृताताई अमर नाडे, उपसरपंच वैभव सापसोड, भाजपाचे महेश कणसे, विजय काळे, लताताई भोसले, उषाताई शिंदे, रवी माकुडे, लहू सव्वाशे, नागराज बचाटे, संतोष काळे, आबू देवकर, वैजनाथ हराळे, शहानुर पठाण, सुरज सूर्यवंशी, शाम करपे, रमाकांत गायकवाड, विष्णू महानवर, शाहीन सय्यद, अशोक चव्हाण, योगेश पुदाले, दत्ता पुदाले यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. मुरुड येथील भाजपाच्या या प्रचार जाहीर सभेस प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता यात महिलांची संख्या लक्षणीय दिसून आली. आ. कराड यांचे मुरुड नगरीत आगमन होताच फटाक्याची आतिषबाजी करून ढोल ताशाच्या गजरात जोरदार स्वागत करण्यात आले.

या जाहीर सभेत बोलताना भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेली वीस - पंचवीस वर्ष ज्यांनी मुरुडवर राज्य केले त्यांनी मुरुड साठी काय केले असा प्रश्न उपस्थित करून मुरुड हे बाजारपेठेचे मोठे गाव असून प्रत्येक वेळी विकासाला आडवे येऊन मुरुडला विकासापासून वंचित ठेवण्याचे पाप केले. प्रत्येक वेळी आपल्या सोयीनुसार कधी घड्याळ, कधी तुतारी तर जमल तेव्हा हात. नेमके हे आहेत तरी कुठे असा प्रश्न उपस्थित



करून स्वतःसाठी सातत्याने राजकीय भूमिका बदलणाऱ्यांना मतदारांनी जागा दाखवावी असे बोलून दाखवले.

या मतदार संघावर पन्नास वर्षे सत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेसवाल्यांनी सातत्याने मुरुडकडे दुर्लक्ष केले असून विकासाची कोणतीही योजना मंजूर केली नाही उलट आमदार होऊन मला एक वर्ष झाले भाजपा शासनाच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करून विकास आणि विकास निधी काय असतो हे दाखवून देण्याचे काम केले असल्याचे सांगून पुढे बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, केंद्रातील मोदीजींच्या आणि राज्यातील देवेंद्रजी फडणवीस यांच्या शासनाच्या माध्यमातून सिमेंट रस्ते, आरोग्याच्या सुविधा, पाणी पुरवठ्याच्या योजना यासह विविध विकास कामातून विकासाची मोठी उंची गाठली असून गोरगरीब सर्वसामान्य जनतेला शेतकरी पेन्शन, शेतीला मोफत वीज, लाडकी बहीण, महिलांना प्रवासात सवलत, मागेल त्याला शेततळे, गाय गोठे, मोफत अन्नधान्य, घरकुल, सौर ऊर्जा पंप यासह विविध योजनेच्या माध्यमातून दिलासा देण्याचे काम झाले. आपल्या गावाच्या आणि परिसराच्या विकासासाठी भाजपा शिवाय पर्याय नाही तेंव्हा जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतील भाजपाच्या तिन्ही उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आव्हान केले.

या सभेत माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे बोलताना म्हणाले की, विकासाची दृष्टी असलेल्या भाजपाकडे देशात आणि राज्यात नेतृत्व असून त्यांच्या माध्यमातून वेगाने विकास कामे होताना दिसत आहेत. प्रत्येक घटकांना न्याय दिला जात आहे. लातूर ग्रामीण मतदार संघात विविध विकास कामासाठी कोट्यावधी रुपये खेचून आणण्याचे काम रमेशआप्पा कराड यांनी केले असून जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी २४ तास उपलब्ध असणारे रमेशआप्पा एकमेव आमदार आहेत. ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी भाजपाच्या सर्व उमेदवारांना आशीर्वाद देऊन बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले. या सभेत सरपंच अमृता नाडे, उपसरपंच वैभव सापसोड, महेश कणसे, लहू सव्वाशे यांच्यासह अनेकांनी मनोगत व्यक्त करून आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून मुरुड नगरीत झालेल्या विविध विकास कामाची माहिती देऊन मुरुडची जनता विकाससोबत आहे त्यामुळे मुरुड येथील भाजपाच्या तिन्ही जागा प्रचंड बहुमताने विजयी व्हाव्यात यासाठी आम्ही सर्वजण जिद्दीने जोमाने काम करीत असल्याचे बोलून दाखविले सभेचे सूत्रसंचालन वैजनाथ हराळे यांनी केले. या सभेला मुरुड नगरीतील मतदार बंधू भगिनीचा प्रचंड मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# मराठवाड्याचे सुपुत्र शंकर गोविंद अमीलकंठावार यांना कार्यकर्ता पुरस्कार प्रदान

लातूर .-प्राचार्य डॉ. अविनाश शिर्के यांनी ग्रामीण विकास आणि सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. या कार्याची उचित स्मृती जागती राहावी या उद्देशाने याच क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्याला दरवर्षी पुरस्कार देण्याचे प्राचार्य डॉ. अविनाश शिर्के मित्र मंडळाच्यावतीने ठरविण्यात आले होते या वर्षीचा पहिला पुरस्कार पाणलोट क्षेत्र आणि ग्रामीण विकास क्षेत्रात राज्यभर पथदर्शक कार्य करणारे मराठवाड्याचे सुपुत्र सामाजिक कार्यकर्ते शंकर गोविंद अमिलकंठावर यांचा पुरस्कार निधी, सन्मानपत्र, मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित गौरव वेदधारीणी विद्यालय, यवतमाळ येथे करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध वक्ते प्राचार्य डॉ. विवेक देशमुख हे होते तर विचारमंचावर प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती रजनी अविनाश शिर्के, सामाजिक कार्यकर्ते डॉ. राजू पाटील, माजी विद्यार्थी प्रा. डॉ. संजय गवई (लातूर) आणि माजी विद्यार्थी कौन्सिलर संजय तेलरांधे (नागपूर) यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य डॉ. अविनाश शिर्के यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले.सत्काराला उत्तर देताना शंकर अमिलकंठावर म्हणाले की, प्राचार्य डॉ. अविनाश शिर्के यांचे ग्रामीण विकास, सामाजिक आणि व्यावसायिक समाजकार्य शिक्षण क्षेत्रात मौलिक असे कार्य आहे. रिचार्ज पिट त्यांची पाणलोट क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाची कल्पना आहे. पूर्वी पाणी अडवा, पाणी जिरवा असे म्हटले जायचे परंतु प्राचार्य डॉ. अविनाश शिर्के यांचा माती अडवा आणि पाणी जिरवा असा आग्रह असायचा. प्राचार्य डॉ. अविनाश शिर्के कृतिशील आचरणाचे व्यावसायिक समाजकार्यातील उत्कृष्ट रोल मॉडेल होते. त्यांच्या नावाने दिला जाणारा हा पहिला पुरस्कार आपण सर्वांनी मला दिला त्याबद्दल मी आपले सर्वांचे ऋण व्यक्त करतो



असेही ते म्हणाले.यावेळी श्रीमती रजनी अविनाश शिर्के म्हणाल्या की, प्राचार्य डॉ. अविनाश शिर्के यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये कुटुंबापेक्षा महाविद्यालयातील संस्था पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना अधिक प्राधान्य दिले. त्यांना सातत्याने परिपूर्ण व्यावसायिक समाज कार्यकर्ता महाविद्यालयाच्या शिक्षणातून घडावा ही त्यांची मनोमन इच्छा होती.

यावेळी बोलताना प्रो. डॉ. संजय गवई म्हणाले की, प्राचार्य डॉ. अविनाश शिर्के हे माझ्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांचे प्रेरणास्थान होते. आज त्यांच्या शिकवणीमुळे आम्ही सर्व विद्यार्थी कर्तव्यनिष्ठ भावनेने आमची जबाबदारी यशस्वीविरीत्या पार पाडत आहोत.

यावेळी संजय तेलरांधे यांनी प्राचार्य डॉ. अविनाश शिर्के यांचा सावित्री जोतिराव समाजकार्य महाविद्यालयाच्या जडणघडणीमध्ये असलेल्या कार्याचा आढावा घेतला.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. विवेक देशमुख म्हणाले की, या पुरस्कारांमुळे सामाजिक कार्यकर्त्यांना सामाजिक कार्याचे प्रोत्साहन मिळते व नव्या पिढीला समाजकार्य करण्याची प्रेरणा मिळते. प्राचार्य डॉ. अविनाश शिर्के यांच्या स्मृती जपण्याचा हा उपक्रम समाजासाठी दिशादर्शक असल्याचेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन नामदेव वाढई, प्रास्ताविक मनोज ठाकरे, पाहुण्यांचा परिचय सुनिल कदम, सन्मानपत्र वाचन विजयकुमार ठेंगेकर आणि आभार ड. सीमा तेलंगे यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. मंगेश हदगावकर, रमेश देवतळे, विजय अग्रवाल, एकनाथ डगवार, प्रभारीप्राचार्य प्रो. डॉ. सीमा शेटे, प्रा. घन:श्याम दरणे, माजी प्राचार्य डॉ. राजेंद्र उमरे, राजू कावल यांच्यासह शहरातील मान्यवर, माजी आणि आजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनिल कदम, संजय सरोदे, महेंद्र गुल्हाने, सचिन साखरकर, उमेश आडे, अंकुश टेकाम, महेश कावल यांच्यासह सर्व माजी आणि आजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा

मुरुड/ महेंद्र आल्टे: येथील संभाजी महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम यांच्या मार्गदर्शनाखाली हा पंधरवडा साजरा करण्यात आला. मराठी विभाग प्रमुख प्रा. सौ. महाजन पी. बी. या महावृत्तशी बोलताना म्हणाल्या की, मराठी भाषेचे जतन, संवर्धन व प्रसार करण्याच्या उद्देशाने राज्यभरात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा केला जातो या पंधरवड्यादरम्यान शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये व विविध सामाजिक संस्थांमार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. संभाजी महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने देखील विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. निबंध लेखन, काव्यलेखन, हस्ताक्षर, शुद्धलेखन, पुस्तक रसग्रहण, प्रश्नमंजुषा



अशा स्पर्धा घेवून विद्यार्थ्यांमध्ये मातृभाषेबद्दल अभिमान व जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मराठी भाषा ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा महत्त्वाचा घटक असल्याने तिचा दैनंदिन व्यवहारात वापर वाढवणे, शुद्ध लेखन-वाचनाला प्रोत्साहन देणे आणि नव्या पिढीत भाषेची गोडी निर्माण करणे हे या पंधरवड्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. तसेच या विविध स्पर्धांमुळे व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्य वृद्धिंगत होण्यास मदत होत असून मराठी भाषेच्या जतनासाठी समाजातील सर्व घटकांनी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. स्पर्धा यशस्वीतेसाठी प्रा. कोल्हे जी. एम., प्रा. घोडके एस. के. यांनी परिश्रम घेतले आहे.

# धम्मराज रोकडे यांना पीएच.डी. प्रदान

पुणे :- पुणे येथील सी.एस. आय.आर. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (छउङ) येथे कार्यरत असलेले एस.आर.एफ. (डशपळी ठशीशरीलह ऋशश्रश्रे) धम्मराज शंकर रोकडे यांना अभियांत्रिकी विज्ञान विद्याशाखेअंतर्गत पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांना ही पदवी द युज ऑफ पॉलीमर कॉम्पोसिट्स अँड ब्लेंड्स इन रिड्युसिंग फ्री सरफेस फ्लो डीफेक्ट्स इन पॉलीमर मेल्ट प्रोसेसिंग ऑपरेशन्स या विषयावरील संशोधन प्रबंधासाठी देण्यात आली.



ही पीएच.डी. पदवी अकॅडेमी ऑफ सायंटिफिक अँड इनोव्हेटिव्ह रिसर्च (लडखठ) या संसदीय कायद्याअंतर्गत स्थापन झालेल्या आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थेचा दर्जा प्राप्त असलेल्या अकॅडेमीकडून प्रदान करण्यात आली.

धम्मराज रोकडे यांनी आपल्या संशोधनात एक्सट्रूजन फिल्म कास्टिंग प्रक्रियेचा वापर करून तयार केल्या जाणाऱ्या पॉलीओलेफिन फिल्म्सच्या कास्टिंग प्रक्रियेत उद्भवणाऱ्या औद्योगिक स्तरावरील दोषांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. या प्रक्रियेदरम्यान निर्माण होणारे फ्री सरफेस फ्लो डीफेक्ट्स हे उत्पादनक्षमतेत मोठा अडथळा ठरतात. त्यांच्या संशोधनातून पॉलीमर कॉम्पोसिट्स आणि ब्लेंड्सचा प्रभावी वापर करून हे दोष कसे कमी करता येतात, याबाबत महत्त्वपूर्ण निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

हे संशोधन पॉलीमर प्रक्रिया उद्योगासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे असून, उत्पादनाची गुणवत्ता व कार्यक्षमता वाढविण्यास मदत करणारे आहे. या संशोधन कार्यासाठी त्यांना डॉ. हर्षवर्धन पोळ यांचे मार्गदर्शन लाभले.

धम्मराज रोकडे यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल वैज्ञानिक, शैक्षणिक व सामाजिक स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# प्लॉट खरेदीसाठी माहेरहून १० लाख रुपये आन, म्हणुन विवाहितेचा छळ.पती, सासू, सासऱ्यासह ७ जणांविरुद्ध गून्हा दाखल

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील




नाव्होली येथील विवाहितेला प्लॉट खरेदी करण्यासाठी माहेरहून १० लाख रुपये घेवून ये म्हणुन सासरच्यांनी शारीरिक,मानसिक छळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी पती, सासू, सासऱ्यासह एकूण ७ जणांविरुद्ध केज पोलिसांत गून्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील सारूळ येथील पुनम हिचा नाव्होली येथील जयदत्त बिक्कड सोबत २०२२ साली विवाह झाला होता. विवाहनंतर काही दिवस सासरच्या मंडळींनी चांगले सांभाळले परंतु

दि.३१/१०/२०२२ पासुन ते २५/२/२०२५ पर्यंत पत्नीच्या ईच्छेविरुद्ध वारंवार व जबरीने अनैसर्गीक शारीरीक संबंध केले व सासरच्या मंडळीने संगणमत करुन तु फ्लॅट घेण्यासाठी माहेरहुन १० लाख रुपये माहेरहून घेवुन ये म्हणुन सतत मारहाण करून नाव्होली व पुणे येथे जाचजुलुम करुन शारीरीक व मानसीक त्रास दिला. व तुला मुलबाळ होवु देणार नाहीत असे म्हणुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. म्हणुन पूनम जयदत्त बिक्कड वय २६ वर्षे रा.नाव्होली ह. मु. सारूळ या विवाहितेच्या फिर्यादीवरून

पती- जयदत्त बाबासाहेब बिक्कड, सासरे -बाबासाहेब देविदास बिक्कड, सासू -गवळणबाई बाबासाहेब बिक्कड, रा. नाहोली ता. केज. जि बीड.नंदावे- बाबासाहेब विठ्ठल ढाकणे, ननंद दिपाली बाबासाहेब ढाकणे, दोघे रा. उपळाई ता. कळंब नंदावे -संतोष रावसाहेब तांदळे, ननंद- ज्योती संतोष तांदळे दोन्ही रा. धोंडराई ता. गेवराई या सात जणाविरुद्ध केज पोलिसात गून्हा नोंद करण्यात आला आसून

सदर गुन्ह्याचा पुढील तपास हा पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उप निरीक्षक प्रकाश शेळके हे करीत आहेत.

# ट्रिपल इंजिनला विकासाचे डबेच नाहीत, त्यामुळे महायुतीच्या भुलथापांना बळी पडू नका

लातूर : महायुतीच्या ट्रिपल इंजिनला विकासाचे डब्बेच नाहीत, त्यामुळे त्यांच्या भुलथापांना बळी पडू नका, गाफिल राहू नका, काँग्रेसच सर्वधर्म समभाव मानणारा, माणुसकी जपणारा आणि विकासाचं राजकारण करणारा पक्ष आहे. म्हणून उद्याच्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवारांना प्रचंड बहुमतांनी विजयी करा, असे आवाहन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, सहकार महर्षी तथा माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी येथे केले.




हरंगुळ बुद्रुक जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मतदार संघातील काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार सौ. भागीरथीताई उर्फ उषा शिवानंद पाटील, सत्यनारायण उर्फ शैलेश पाटील आणि विलास उफाडे यांच्या प्रचारार्थ ५ फेब्रुवारी रोजी सकाळी राधाई फॅब्रिकेशन समोर कळंब रोड, रेल्वे गेट हरंगुळ बु. येथे आयोजित कॉर्नर सभेत दिलीपराव देशमुख हे बोलत होते. यावेळी ते म्हणाले, काँग्रेस जातीवाद, धर्मवाद मानत नाही, लोकशाही, संविधान मानणारा पक्ष आहे. लातूर जिल्हा परिषदेला गतवैभव मिळवून देण्यासाठी आपल्या भागाचा विकास साधण्यासाठी काँग्रेस उमेदवारांना निवडुन देण्याशिवाय पर्याय नाही. कारण काँग्रेसच सर्वाना न्याय देऊ शकतो आणि सर्वांची प्रगती करू शकतो. हरंगुळ जिल्हा परिषद मतदार संघ हा आदर्श मतदार संघ आहे, तो आदर्शच ठेवू, त्यासाठी हाताचा पंजाचे बटण दाबून काँग्रेस उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा. असे शेवटी आवाहन केले.

प्रारंभी दिलीपराव देशमुख यांचे आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करुन हलगी नादात स्वागत करण्यात आले. हरंगुळ बु. ग्रामपंचायतच्या विकासनगर प्रभागातुन पाचवेळा सदस्य राहिलेले प्रभू राठोड यांनी दिलीपराव देशमुख यांचा सत्कार केला. माजी जि. प. सदस्य परमेश्वर वाघमारे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.याप्रसंगी हरंगुळ बु. सरपंच भीमाशंकर झुंजारे, हरंगुळ खुर्दचे सरपंच मनोहर झुंजे पाटील, धनंजय पाटील, मार्केट कमिटीचे सदस्य आनंदराव पवार, मुन्ना पटेल, पंकज सुतार, संजय राठोड, ग्रा. पं. सदस्य ज्योती राठोड, कालिंदा चव्हाण, संगीता लोभा राठोड, सविता पवार, उषा संजय राठोड, कविता संजय राठोड, शोभा मुळे, सरदार बिट्टू पाटील, रामभाऊ वाघमारे, राहुल कांबळे, सुजित पंकज सुतार आदिसह काँग्रेसचे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि मतदार महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाकळी येथील प्राथमिक निवासी आश्रम शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण

केज/प्रतिनिधी .-केज तालुक्यातील



टाकळी येथील प्राथमिक निवासी आश्रम शाळेत प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत क्रीडा स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. या विविध क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती काशीबाई घुले यांची प्रमुख उपस्थिती लाभली.या कार्यक्रमास मार्गदर्शन शाळेचे मुख्याध्यापक श्री. अनंतकुमार घुले सर यांनी केले. यावेळी युवा नेते श्री. श्रीकांत घुले ले, श्री. आठरे सर तसेच पालक प्रतिनिधी श्री. गोविंद घुले यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धांचे महत्त्व सांगत प्रेरणादायी विचार मांडले. क्रीडा क्षेत्रामुळे शिस्त, संघभावना व आत्मविश्वास वाढतो, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

या क्रीडा स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे वितरित करण्यात आली. बक्षीस स्वीकारताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह झळकत होता.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन क्रीडा विभाग प्रमुख श्री. बारगजे सर यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी चौरे सर यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

# लातुरात दि. ११ ते १३ फेब्रुवारी या कालावधीत नवनिर्माण व्याख्यानमालेचे आयोजन

लातूर : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक प.पू. गोळवलकर गुरुजी यांच्या जन्मदिनानिमित्त दि. ११ ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत लातुरात प्रतिवर्षाप्रमाणे नवनिर्माण प्रतिष्ठानच्या वतीने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख यांनी दिली.

सन २०२५ -२६ या वर्षात ' वंदे मातरम ' या राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापनदिन, रा. स्व. संघाच्या स्थापनेचे शताब्दी वर्ष व पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी समाजोन्नतीसाठी मांडलेले ' एकात्म मानव दर्शन' या सिद्धांताचे हीरक महोत्सवी वर्ष अशा विचारांच्या त्रिवेणी संगमाचा योग लक्षात घेऊन सदर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. दि. ११ फेब्रुवारी रोजी नाशिकच्या स्वामी विवेकानंद केंद्राचे सहसंचालक प्रकाश पाठक यांचे ' एकात्म मानव दर्शन' या विषयावर , दि. १२ फेब्रुवारी रोजी प्राचार्य अनंतराव पांडे यांचे ' पंच परिवर्तनातून सामर्थ्यशाली समाज व वैभवशाली राष्ट्र निर्मिती , तर दि. १३ फेब्रुवारी रोजी विद्यावाचस्पती गुरुदेव शंकरराव अभ्यंकर यांचे ' वंदे मातरम - राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापनदिन या विषयावर व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून अनुक्रमे भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष सुशिलदादा बाजपायी , योगाचार्य दिलीपराव भातलवंडे , माजी कुलगुरू कर्नल डॉ. कारभारी काळे यांची उपस्थिती राहणार आहे.

ही व्याख्यानमाला दररोज सायंकाळी सहा वाजता दयानंद सभागृह, लातूर याठिकाणी होणार आहे. या व्याख्यानमालेचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, उपाध्यक्ष महेंद्र जोशी, कार्यवाह अशोक शिवणे , कोषाध्यक्ष उमेश कुलकर्णी यांसह सुधीर धुत्तेकर, शैलेश कुलकर्णी, धनंजय पटवारी, संजय गुरव, सौ. प्राजक्ता देशमुख, एड. सौ. प्रणाली रायचूरकर, व्यंकटेश कुलकर्णी, चंद्रकांत कुलकर्णी, उमेश सेलूकर, किशोर कुलकर्णी, यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाच्या नेत्या डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांचा प्रचाराचा झंझावात

लातूर जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या प्रचार मोहिमेला वेग आला असून डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या नेतृत्वाखाली विविध ठिकाणी सभा व कॉर्नर बैठका संपन्न झाल्या.पाकर सांगवी, हरंगुळ, चापोली, वडवळ नागनाथ, नळगीर, सोमनाथपूर, नळेगाव, आर्वी या जिल्हा परिषद गटामध्ये विविध गावांमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित कार्यक्रमांना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी उपस्थित राहून जनतेशी थेट संवाद साधला. या संवादादरम्यान ग्रामविकास, रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण तसेच युवकांना रोजगाराच्या संधी या प्रमुख मुद्द्यांवर भर देण्यात आला.सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या मंत्रावर विश्वास ठेवत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर शिक्कामोर्तब करत सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पार्टीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमतांनी विजयी करावे, असे आवाहन डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी मतदार बांधवांना केले.



हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.